# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १९/१०/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कुही**:– दिनांक १९/०१/२०१७ चे २३.१६ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अप. क्र. १४/२०१७ कलम ३५४, ३४१ भादवी सहकलम ३(१)(w)(i)(ii) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १९/०१/२०१७ चे १४.३० वा. सुमारास फिर्यादी/पीडित मुलगी वय २० वर्ष हि सायकलनी गावी टाकळी येथील शिवारात नाल्याच्या चढावावर चढत असतांना आरोपी नामे– पुरूषोत्तम कवळुजी भोयर, वय ६४ वर्ष, रा. टाकळी त. कुही याने तिची सायकल नाल्यात फेकुन दिली व तिला शेतात नेवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी श्री सुनिल जैस्वाल, उमरेड विभाग उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १९/१०/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री एम.बी. गावंडे, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ भादंवि. कायद्यान्वये ६ महिने साधी कैद व ५००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद सहकलम ३४१ भादंवि. कायद्यान्वये १५ दिवस साधी कैद व ५००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे व कर्मचारी मपोशि शितल मेश्राम पो.स्टे कुही व पोना प्रकाश वर्मा पोलिस मुख्यालय ना.ग्रा यांनी मदत केली आहे.

### पो.स्टे.कळमेश्वर हद्दीमधील आष्टी गावात जुगार अड्डयावर धाड
### –: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :–

दिनांक १९/१०/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा आष्टी शिवारातील निसर्ग लॉन चे बाजूला काही इसम हे तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळत असल्याचे गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा आष्टी शिवारातील निसर्ग लॉन चे बाजूला सापळा रचुन छापा टाकुन एकुण १० जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी १,११,६५०/–रू., तासपत्ते, जुगाराचे इतर साहीत्य व एक चार चाकी वाहन ५,०४,७५०/–रू. चा माल व ८ मोबाईल संच की. ९१,०००/–रू. असा एकुण कि ७,०७,४००/–रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे कळमेश्वर करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात पोहवा विनोद काळे, गजेंद्र चौधरी, पोना मयूर ढेकळे, सत्यशिल कोठारे, अमृत किनगे, रोहन डाखोरे, अमोल वाघ, पोशी सुमित बांगडे यांचे पथकाने केली.

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील न्यु शिव नगर हॉटेल जवळ मौदा येथे दिनांक १८/१०/२२ चे १२.३० वा. ते १४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ मंजुशा राजकुमार देमदे, वय ४३ वर्ष, रा. न्यु शिव नगर हॉटेल जवळ, मौदा यांचे पती हे स्वता पेपर मिल मध्ये काम करतात. त्यामुळे दि १८/१०/२२ रोजी सकाळी ०८.३० वा. कामावर गेले होते व मुलगा शाळेत गेला होता. त्यानंतर फिर्यादीच्या पतीची चांदीची चैन टुटलेली होती त्यामुळे तिला दुरुस्त करन्याकरीता फिर्यादी सोनाराच्या दुकानात १२.३० वा. दुपारी गेली. तसेच २०.३० वा. सोनाराच्या त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचा दवाज्याचा कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बाथरुम समोरील लोंखडी आलमारीचा लोक तोडुन आलमारीतील कपडे सामान अस्त वेस्त केले. तसेच आरोपीने बेडरुम मधील आलमारीतील ठेवलेले लग्नामध्ये आलेले सोन्या—चांदीचे दागीने कि. १,४८,५००/—रु. दागीने व फिर्यादीचे सासुची फिक्स डिपॉजीट कॅश व पतीचे नगदी जमा असलेले एकुण कि. २,३०,०००/—रु. एकुण किं. ३,७८,५००/—रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर मो. क्र ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**